# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २३७-२२ दिनांक ०३/०८/२०२२

## चैन स्नॅचिंग करणा-या आरोपीतांस अटक करुन चोरीस गेलेला मुदेदमाल हस्तगत - आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

आचोळे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ३०/०७/२०२२ रोजी सायं. १७.३० वा. चे सुमारास फिर्यादी श्रीमती सुनीता सिताराम गुंडये, वय ६५ वर्षे, रा. भारत कॉलनी, डॉन लेन, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व), ता. वसई, जि. पालघर या त्यांच्या घरी जात असताना श्याम पेंढारी यांच्या ऑफीससमोर आल्या असता त्यांच्या समोर एक मोटार स्कुटर थांबली. फिर्यादी यांच्या पाठीमागुन एक इसम त्यांच्या जवळ आला व त्यांच्या गळयातील दोन तोळे वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचुन पळुन गेले. सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आचोळे पोलीस ठाणे येथे I गुन्हा रजि. क्र. ३५७/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासकामी आचोळे पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटिकरण पथकाने घटनास्थळी भेट देवून तेथील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचेकडे तपास केला. तसेच तांत्रिक तपास करुनही उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. दिनांक ३१/०७/२०२२ रोजी गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने संशयित नामे १) जयराज मधुकर पाटिल, वय ३३ वर्षे, धंदा नाही, रा. साई संतोषी अपार्टमेंट, रु.नं. ००१, संतोषी माता मंदिराजवळ, चिमगर आळी, आचोळे गाव, नालासोपारा पुर्व. २) मनिष मोहन बसवत, वय २४ वर्षे, धंदा नाही, रा. भेंडीपाडा, भिमनगर, राजोडी, नालासोपारा पश्चिम नालासोपारा (पश्चिम) यांना रोजोडी नालासोपारा पश्चिम येथून ताब्यात घेतले. नमूद दोन्ही आरोपीतांना सदर गुन्हयाच्या अनुषंगाने कौशल्यपुर्वक विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची माहिती दिल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करुन त्यांच्याकडुन ४०,०००/- रु. किंमतीची आठ ग्रॅम वजनाची सोन्याची गोल मण्यांची माळ व गुन्हयात वापरलेली २५,०००/- रु. किंमतीची मोटार स्कुटर असा एकुण ६५,०००/- रुपये किमंतीचा मुदेदमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री पंकज शिरसाठ, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री चंद्रकांत सरोदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री सुधीर गवळी, पोलीस निरीक्षक गुन्हे, श्री सुधीर थोरात, सहा. पोलीस निरीक्षक, पो.हवा. डी.एस दाईंगडे, नितीन जाधव, शेखर पवार, पो.ना. प्रशांत सावदेकर, संदिप बडगुजर, पो.शि. अभिजीत नेवारे, बालाजी शिंदे, बालाजी संगमे, ज्ञानेश जोहरे, बंडगर यांनी पार पाडली आहे.

----ooooo----